<u>**नियमीत दिवाणी मुकदमा क्र.३४२/२०१२**</u>

ताराबाई अनंता पाटील व इतर
विरूध्द
ताराबाई काशिनाथ पावशे व इतर

<u>**आदेश निशाणी क्र.११३ वर**</u>

प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे हरकत अर्जदार यांना प्रस्तुत दाव्यात पक्षकार म्हणून प्रतिवादीपणात समावेश करण्यासाठी सादर केला आहे. अर्ज, वादीचे म्हणणे व दावा वाचला. कागदपत्र अवलोकन केले. वादी व अर्जदार यांचे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

२. अर्जकथन थोडक्यात असे आहे की, प्रस्तुत दावा संपादित मिळकती संदर्भात मिळणारे भूखंड यास हक्क प्रस्थापित करणे व भूखंडामध्ये निम्मा हिस्सा मिळकत संदर्भात दाखल केला आहे. वादीने निशाणी १०९ अर्ज सादर करून नोड तळोजा, सेक्टर क्र. २५, भूखंड क्र.२, क्षेत्रफळ ३२०० चौ.मि. या भूखंडासंदर्भात प्रतिवादी यांनी त्रयस्थ व्यक्तीचे हक्क निर्माण करू नये व जैसे थे परिस्थिती कायम ठेवावी अशी मागणी केली होती. सदर अर्जावर न्यायालयाने आदेश पारीत करून जैसे थे परिस्थिती ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. प्रत्यक्षात नोड तळोजा, सेक्टर क्र.२५, भूखंड क्र.२, क्षेत्रफळ ३२०० चौ.मि. हा भूखंड फाईल क्र.४८० + ८०५ + ९९३ या फाईल्स एकत्र करून मंजूर झाला आहे. सदर फाईल क्र.४८० + ८०५ + ९९३ अंतर्गत हरकतदार हाली आबा पाटील उर्फ शर्मिला शिवराम पाटील व काळू उर्फ काळूराम लाडकू म्हात्रे यांना मौजे पेंधर येथील त्यांचे संपादित मिळकतीपोटी प्राप्त होणारे

४०० चौ.मि. क्षेत्रफळाची पात्रता सदर फाईलमध्ये समावेश करण्यात आले आहे. सदर ४०० चौ.मि. पात्रतेपैकी १५० चौ.मि. पात्रता काळू उर्फ काळूराम लाडकू म्हात्रे यांची आहे व उर्वरीत २५० चौ.मि. क्षेत्राची पात्रता हरकतदार श्रीमती हाली आबा पाटील उर्फ शर्मिला शिवराम पाटील यांची आहे. सदर भूखंड दिनांक १८-०६-२०१८ रोजी भाडेकरारावर हस्तांतरीत झाला आहे. सदर भूखंडाबाबत अंतरीम आदेश पारीत झाला असल्याने हरकतदार यांचे अपरिमित नुकसान होत आहे. अर्जदार/हरकतदार हिला या दाव्याचे कामी पक्षकार म्हणून समावेश करणे आवश्यक आहे. याकरीता प्रस्तुत अर्ज सादर केला आहे.

३. वादीने निशाणी १२१ वर अर्जास म्हणणे सादर केले आहे. त्यांनी अर्जास हरकत घेतली आहे. अर्ज चुकीचा व बेकायदेशीर आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रस्तुत दावा केवळ २९०० चौरस मिटर भूखंडाबाबत केला आहे. हरकतदार यांचा दाव्याशी पक्षकार व मिळकतीशी संबंध नाही. त्यामुळे त्यांना पक्षकार करणे प्रश्न निर्माण होत नाही. हरकतदार यांचा कथीत ४०० चौ.मि. पात्रतेचा भूखंड जर सिडकोने एकत्रित केला असेल तर तो त्यांचा कथीत भूखंड सिडकोकडून स्वतंत्र करून घेणे एवढाच पर्याय हरकतदार यांचेकडे उपलब्ध आहे. हरकतदार यांना दाव्यात पक्षकार करून घेतल्यास, निष्कारण गुंतागूंत निर्माण होवून वादीच्या हक्कावर विपरीत परिणाम होईल. वादीच्या मागणीसाठी दाव्यात पक्षकार कोण असावे हा केवळा वादीचा स्वेच्छाधिकार आहे. हरकतदार हे आवश्यक किंवा योग्य पक्षकार नाहीत. जैसे थे परिस्थिती ठेवण्याचा आदेश केवळ दावा मिळकत म्हणजेच २९०० चौ.मि. भूखंड संदर्भात लागू आहे. त्यामुळे सदर आदेशाचा हरकतदार यांचेवर कोणताही परिणाम होत नाही.

हरकतदार हे कथन करीत असलेले ४०० चौ.मि. भूखंडाचे चतु:सीमा सह नकाशा सादर करावा, अशी नोटीस देण्यात आली होती. सदर नोटीसउत्तरात वादींचा संपूर्ण दावा मिळकतीशी संबंध नाही असे नमूद करून खुलासा करणेस नकार दिला. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

४. विचारार्थ पुढील मुद्दे उपस्थित झाले. त्यावर निष्कर्ष व कारणमीमांसा पुढीलप्रमाणे नोंदवत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | हरकतअर्जदार ही सदर दाव्याचे कामी आवश्यक व/किंवा योग्य पक्षकार आहे का ? | ...होय. |
| २. | आदेश काय? | ...आदेशाप्रमाणे |

## :: कारणमीमांसा ::

**मुद्दा क्र.१ करीता. :-**

५. प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे हरकतदार/अर्जदार यांना तसेच अर्जात नमूद व्यक्तींना प्रतिवादी म्हणून समावेश करण्यासाठी सादर केला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे प्रकरणात वादातीत असलेले सर्व वादप्रश्न परिणामकारकपणे आणि पूर्णत: निर्णीत करण्यासाठी उपस्थिती आवश्यक असलेले व्यक्तींना पक्षकारांचे अर्जावरून किंवा स्वत:हून न्यायालय पक्षकार म्हणून समावेश करण्याचा आदेश पारीत करता येतो.

६. प्रस्तुत अर्जास वादीचे वतीने हरकत घेतलेली आहे. प्रकरणात पक्षकार म्हणून सामील कोणास करावे हा वादीचा स्वेच्छाधिकार आहे.

७. प्रस्तुत अर्जात नमूद व्यक्ती यांची दाव्याचे कामी उपस्थिती आवश्यक आहे का? हे तपासणे आवश्यक आहे. प्रस्तुत दावा, दावा परीच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीबाबत वाटप व इतर अनुतोष मिळणेकरीता वादीने सादर केला आहे. दावा परीच्छेद २ मधील मिळकती संदर्भातील वाद हा केवळ वादी व प्रतिवादी यांचे कुटूंब यांचेशी संबंधीत आहे. प्रस्तुत दावा १९९८ साली दाखल केलेला आहे. दावा मिळकती संपादनाचे मोबदल्यात सिडको कार्यालयाकडून भूखंड मिळकत वाटप करण्यात आली आहे. या संदर्भातील मिळालेले भूखंड मिळकतीचे वर्णन संबंधीत सुधारणा वादीने अद्याप दाव्यात समावेश केलेली नाही. तथापि वादीने दिनांक १२-०८-२०२२ रोजी निशाणी १०९ प्रमाणे अर्ज सादर केला व दाव्यातील प्रतिवादी क्र.२/१ ते २/१० यांनी संपादनापोटी मिळालेले भूखंडामध्ये प्रतिवादी क्र.५ याचे सहाय्याने त्रयस्थ इसमाचे हक्क निर्माण करू नये तसेच संपादनापोटी वितरीत केलेल्या भूखंडासंदर्भात जैसे थे परिस्थिती ठेवावी असा आदेश पारीत करावा अशी विनंती केली होती. सदर अर्जावर न्यायालयाने पुढील दिनांकापर्यंत दावा मिळकतीची परिस्थिती आहे तशी म्हणजे जैसे थे ठेवावी असा आदेश पारीत केलेला आहे. थोडक्यात दावा मिळकतीचे मोबदल्यात १२.५ टक्के योजनेअंतर्गत भूखंड वितरीत झाला आहे.

८. दावा मिळकतीचे मोबदल्यात वितरीत झालेला भूखंड हा २९०० चौरस मिटर क्षेत्राचा आहे. परंतु सिडको कार्यालयाने

फाईल क्र.४८०+८०५+९९३ हे एकत्र करून काळू उर्फ काळूराम लाडकू म्हात्रे व हाली आबा पाटील उर्फ शर्मिला शिवराम पाटील यांची पात्रता असलेले भूखंड एकत्र करून त्यांना सामाईकात ३२०० चौ.मि. भूखंड दिनांक ११-०६-२०१८ रोजीचे भाडेकराराने वितरीत केला आहे. ३२०० चौ.मि. भूखंड सामाईकात प्रतिवादींचे पूर्वज ताराबाई काशिनाथ पावशे व प्रस्तुत अर्जदार हाली आबा पाटील उर्फ शर्मिला शिवराम पाटील व काळू उर्फ काळूराम लाडकू म्हात्रे यांना वितरीत झालेला आहे. प्रस्तुत दाव्यातील मूळ वादप्रश्न म्हणजेच वादी हे वाटप मिळणेस हक्कदार आहेत का? व वादींचा हक्क, हिस्सा आहे का? या संदर्भात प्रस्तुत अर्जदारांची उपस्थिती आवश्यक नाही परंतु वादातीत भूखंड किंवा वाद मिळकत ही आता प्रस्तुत हरकत अर्जदारांचे सामाईक क्षेत्रासह मिळकत असल्याने प्रस्तुत दाव्याचे कामी होणारे निर्णयाचा परिणाम प्रस्तुत हरकत अर्जदारांचे हक्कावर होणार आहे. त्यामुळे प्रस्तुत हरकत अर्जदारांची दाव्याकामी व दाव्याचे वादप्रश्न परिणामकारकपणे व अंतिमतः निर्णीत करणेसाठी उपस्थिती आवश्यक आहे. त्यामुळे अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. याप्रमाणे मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर नोंदवून पुढील आदेश पारीत करीत आहे.

:: **<u>आदेश</u>** ::

१. निशाणी ११३ अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जात नमूद केल्याप्रमाणे हरकत अर्जदार हाली आबा पाटील उर्फ शर्मिला शिवराम पाटील हिला दाव्यात प्रतिवादी म्हणून वादीने समावेश करावे व तशी सुधारणा करावी असे वादीस आदेशीत करण्यात येते.

३. वरीलप्रमाणे सुधारणा १४ दिवसाचे आंत करावी. यात कसूर केल्यास दावा विनाकारवाई खारीज करण्यात

येईल.

पनवेल,
दिनांक : ०३-०२-२०२३.

(के.एम.सोनवणे)
३रे सह दिवाणी न्यायाधीश
वरीष्ठ स्तर पनवेल.